# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग समिती

## सभावृत्तांत [ कार्यपत्रिका क्रमांक ४ ]

**दिनांक :१५ /६/२०१६** **वेळ : दुपारी १२.०० वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे जुन २०१६ ची मासिक सभा बुधवार दिनांक १५/६/२०१६ रोजी दु. १२.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

1. मा. पांढरकर निलेश शंकरराव – सभापती
2. मा. पात्रे राम संभाजी
3. मा. बाबर शारदा प्रकाश
4. मा. उल्हास शेट्टी
5. मा. भारती फरांदे
6. मा. आर.एस.कुमार
7. मा. भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर
8. मा. राजू मिसाळ
9. मा. नंदा विकास ताकवणे
10. मा. प्रसाद शेट्टी
11. मा. झांबरे सतिश आनंदा [ स्वीकृत सदस्य ]
12. मा. बेबीनंदा राम भोंडवे [ स्वीकृत सदस्य ]
13. मा. गिरीष गोपाळ कुटे [ स्वीकृत सदस्य ]

तसेच श्री. चंद्रकांत खोसे - क्षेत्रीय अधिकारी, श्री. फारुक शेख - कार्यकारी अभियंता, स्थापत्य, श्री. मिलींद कपिले- कार्यकारी अभियंता विद्युत, श्रीम.रेखा गाडेकर - प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री प्रदीप पुजारी – प्रभारी कार्यकारी अभियंता झोनिपु, श्री गायकवाड पी एम – उदयान अधिक्षक, श्री.सुनिल वाघुंडे, श्री. हनुमंत शिंदे , श्री. बन्सल एच.पी. , श्रीम बाबर एल.एस.,श्रीम मोमीन झेड आय , श्री वैभव उसाळकर, श्री विजय भोजने - उपअभियंता , श्री पी.जे. कदम - लेखाधिकारी , श्री.एम.एम.शिंदे - सहा. आरोग्याधिकारी, श्री फाटक डी डी, श्री गेंगजे एच बी, श्री वैदय एस आर, श्री बेळगावकर – कनिष्ठ अभियंता , श्री. माळी एस.के. - पशुवैद्यकिय आरोग्य निरिक्षक, श्री कुंभार पी एल – हॉ. सुपरवायजर , श्रीम डी डी गुमास्ते – कार्यालय अधिक्षक तथा अतिक्रमण प्रमुख, श्री रविंद्र एन पिंगळे - ASI [ वाहतूक ] निगडी उपस्थित होते.

मा. सभापती यांनी उपस्थित सन्मा. नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करुन सभा सुरु करणेस अनुमती दिली.

सर्व प्रथम मागील सभेचा सभावृत्तांत [ दिनांक 23/5/2016 कार्यपत्रिका क्रमांक 3 ] कायम करणेत आला त्यानंतर माहे मार्च 2016 [ कार्यपत्रिका क्रमांक 12 ] चे मासिक सभेच्या सभावृत्तांत मधील ठराव क्रमांक ७१ विषय क्रमांक ०७ मध्ये प्रभाग क्रमांक १८ किवळे भागातील भिमाशंकरनगर येथील रस्ता , चौक व कॉलनी संबंधी नमुद केलेल्या नामकरण ठरावास मान्यता देण्यात आली याऐवजी **प्रभाग क्रमांक १८ किवळे येथील भिमाशंकरनगर येथील शेवटच्या बसस्टॉप जवळील चौकास " श्री. छत्रपती शिवाजी महाराज चौक " असे नामकरण करणेबाबतचा ठराव सर्वानुमते मान्य अशी दुरुस्ती करणेस मान्यता देणेत आली.**

मा. सभापती यांचे परवानगीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक ६ : सन्मा. नगरसदस्या, मनिषा काळूराम पवार यांचा दि. 15/6/2016 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 25 चिंचवड स्टेशन येथील दवा बाजार रस्त्यावर, प्रिन्स फुटवेअर दुकानाजवळ कमान उभारणे व त्यास **स्व. मारुती लक्ष्मण पवार प्रवेशद्वार** असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे तसेच सदरचे काम प्रभागातील अथवा मुख्यालयाकडील चालु असलेल्या स्थापत्य् विषयक कामातून करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक ७ : सन्मा. नगरसदस्य, राजू मिसाळ यांचा दि. 15/6/2016 चा प्रस्ताव

अ क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील अनेक मैदाने, सभागृहे नागरिकांना संस्थांना भाडे तत्वावर तात्पुरत्या वापराकरीता म.न.पा. मार्फत दिले जात असतात. मनपातील मा. नगरसदस्यांना विविध कार्यक्रमांकरीता सदरची मैदाने, सभागृहांची अनेक वेळा आवश्यकता असते. परंतु म.न.पा. प्रशासनामार्फत सदरची मैदान, सभागृहे संस्थाना अथवा नागरिकांना परस्पर देण्यात येत असल्यामुळे स्थानिक नगरसदस्य त्याबाबत अनभिज्ञ असतात व त्यांना त्यांचे कार्यक्रमांचे नियोजन करताना अडचणी येतात. मनपाचे नुकसान न होता तसेच मा. नगरसदस्य यांना त्यांच्या कार्यक्रमाचे सुनियोजन करता यावे याकरीता मनपा प्रशासनाकडे सदरची मैदाने, सभागृहे भाडे तत्वावर मागणी करणा-या नागरिकांना अथवा संस्थेस स्थानिक नगरसदस्य यांचे पत्र आणणे बंधनकारक करावे व सदर पत्राशिवाय मैदाने, सभागृहे भाडे तत्वावर देण्यात येऊ नये.

विषय क्रमांक ८ : सन्मा. नगरसदस्या, सविता सुरेश साळुंके यांचा दि. 15/6/2016 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 27 मोरवाडीमध्ये निगडी दापोडी हा बीआरटीएस रस्ता जात आहे. या रस्त्यावर नजीकच्या भविष्यात बीआरटीएस बससेवा चालू करणेत येणार आहे. या रस्त्यावरील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकामध्ये बँक ऑफ महाराष्ट्रचे समोर बीआरटीएस बसथांबा आहे. याठिकाणचे बसथांब्याला **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक / Punyashloak Ahilyadevi Holkar Chouk** असे नाव देणेत यावे. या करीता पुणे महानगर परिवहन महामंडळ [ PMPML ] कडून वेगळी मान्यता घेणेची वाट न पाहता सदरचे नामकरण करणेत यावे.

**तसेच** याच चौकामधील ग्रेड सेपरेटरला **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समतल विगलक / Punyashloak Ahilyadevi Holkar Grade Separator** असे नामकरण करणेच्या प्रस्तावास मान्यता मिळावी.

ठराव क्रमांक : १५ विषय क्रमांक : १
दिनांक : १५/६/२०१६ विभाग :
सुचक : मा. प्रसाद शेट्टी अनुमोदक : मा. भारती फरांदे

संदर्भ : मा. प्रसाद शंकर शेट्टी यांचा दिनांक १३/०३/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २५ चिंचवड स्टेशन येथील पुणे-मुंबई रस्त्यालगत जगन्नाथ कॉम्पलेक्स हौ.सो. समोरील ६.०० मीटर रुंद रस्त्यास "हस्तीमल शेठ गादिया मार्ग" असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेच्या वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : १६ विषय क्रमांक : २
दिनांक : १५/६/२०१६ विभाग :
सुचक : मा. आर एस कुमार अनुमोदक : मा.प्रतिभा भालेराव

संदर्भ : मा. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांचा दि. ९/१२/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

शुभारंभ कॉलनी, स.नं. (१३१/२ व १३०/१ मधील) यास शुभारंभ कॉलनी असा नामफलक बसवून मिळणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

ठराव क्रमांक : १७ विषय क्रमांक : ३
दिनांक : १५/६/२०१६ विभाग :
सुचक : मा. प्रतिभा भालेराव अनुमोदक : मा.भारती फरांदे

संदर्भ : मा. चारुशीला कुटे, नगरसदस्या यांचा दिनांक १३/१/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक १५ दत्तवाडी मधील नाना स्मृती मंगल कार्यालया मागील लक्ष्मी प्रोव्हीजन स्टोअर पासून ते चर्च पर्यंतच्या रस्त्याला " कै. गणपतराव ज्ञानदेव चव्हाण " तसेच उत्कर्ष क्लासेस ते सेंट्रल बँक या अंतर्गत रस्त्याला " कै. चंपालाल जैन मार्ग " तसेच विठ्ठल मंदिराच्या डाव्या बाजूने श्रीकृष्णनगर पर्यंत जाणा-या रस्त्यास " कै. संपत उमाजी माने मार्ग " व शंकर मंदिर ते कुटे वृंदावन सो. अंतर्गत असणा-या रस्त्याला " कै. बाळासाहेब रंगनाथ जाधव मार्ग " , आदर्श मित्र मंडळ समोरील

रस्त्यास “ कै. ह. भ. प. चांगदेव दादा काकडे ” आणि विघ्नहर गणेश मंदिर ते दक्षिण मुखी मारुती मंदिर अंतर्गत रस्त्यास “ कै. सुषमाताई विनायक जोशी मार्ग ” असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : १८ विषय क्रमांक : ४

दिनांक : १५/६/२०१६ विभाग :

सूचक : मा.प्रतिभा भालेराव अनुमोदक : मा. राजू मिसाळ

संदर्भ : मा. संगिताताई भोंडवे, नगरसदस्या यांचा दिनांक ९/३/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

रावेत बीआरटीएस रोडवरती श्री. बबन शं. शेटे यांच्या घरा समोरील नगरसेविका सौ. संगिताताई राजेंद्र भोंडवे यांच्या नामफलकाशेजारील चौकास “ कै. ज्ञानदेव केसू भोंडवे चौक ” असे नाव देण्यात यावे. तसेच सोनटक्के वस्ती सर्व्हे १२/५ रावेत या ठिकाणी “ यशवंत नगर , सोनटक्के वस्ती ” असे नामकरण करणेत यावे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेची वेळी करणेत यावा.
ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक : १९ विषय क्रमांक : ५

दिनांक : १५/६/२०१६ विभाग :

सूचक : मा. निलेश पांढरकर अनुमोदक : मा. भालेराव प्रतिभा

संदर्भ :- मा. निलेश पांढरकर ,अध्यक्ष अ प्रभाग समिती यांचा दिनांक १०/६/२०१६रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.16 आकुर्डी गावठाण मध्ये शुभश्री रेसिडन्सी या ठिकाणी 750 फ्लॅटची सोसायटी आहे. सोसायटीचे बाहेरील रस्त्याचे दोन्ही बाजूला नागरीक वाहने पार्क करीत असल्याने सोसायटी मधील नागरीकांना त्रास सहन करावा लागतो तसेच दररोज ट्रॅफीक जाम होत आहे. ट्रॅफिक जाममुळे बस सोसायटीचे गेट जवळ येतच नाही. त्यामुळे रस्त्याचे दोन्ही बाजूला वाहन नो पार्किंग व्यवस्था करणेकामी सोसायटीचे नागरीक सतत मागणी करीत आहे. रस्त्याचे दोन्ही बाजूला नो पार्किंग करणेकामी सन 2013 मध्ये मा.विश्वास पांढरे, पुणे शहर पोलिस उपायुक्त यांनी वाहतूक विभागाला पत्र दिले होते, परंतु यावर अद्याप कार्यवाही झालेली नाही.

तरी प्रभाग क्र.16 आकुर्डी गावठाण मध्ये शुभश्री रेसिडन्सी  या ठिकाणी बाहेरील रस्त्याचे फुटपाथचे एकाच  बाजूला नो पार्किंग व्यवस्था होईल अशा पध्दतीने  नो पार्किंग चे बोर्ड  लावणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक : २० | विषय क्रमांक : ६ |
| दिनांक : १५/६/२०१६ | विभाग : |
| सूचक : मा. मनिषा पवार | अनुमोदक : मा. प्रसाद शेट्टी |

संदर्भ : मा मनिषा पवार , नगरसदस्या यांचा दिनांक १५/६/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक 25 चिंचवड स्टेशन येथील दवा बाजार रस्त्यावर, प्रिन्स फुटवेअर दुकानाजवळ कमान उभारणे व त्यास **स्व. मारुती लक्ष्मण पवार प्रवेशद्वार** असे नामकरण करणेस  तसेच सदरचे काम प्रभागातील अथवा मुख्यालयाकडील चालु असलेल्या स्थापत्य् विषयक कामातून करणेस मान्यता देण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

| | |
|---|---|
| ठराव क्रमांक : २१ | विषय क्रमांक : ७ |
| दिनांक : १५/६/२०१६ | विभाग : |
| सूचक : मा. राजू मिसाळ | अनुमोदक : मा. नंदा ताकवणे |

संदर्भ :- मा. राजू मिसाळ, नगरसदस्य यांचा दिनांक १५/६/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

अ क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील अनेक मैदाने, सभागृहे नागरिकांना संस्थांना भाडे तत्वावर तात्पुरत्या वापराकरीता म.न.पा. मार्फत दिले जात असतात. मनपातील मा. नगरसदस्यांना विविध कार्यक्रमांकरीता सदरची मैदाने, सभागृहांची अनेक वेळा आवश्यकता असते. परंतु म.न.पा. प्रशासनामार्फत सदरची मैदान, सभागृहे संस्थाना अथवा नागरिकांना परस्पर देण्यात येत असल्यामुळे स्थानिक नगरसदस्य त्याबाबत अनभिज्ञ असतात व त्यांना त्यांचे कार्यक्रमांचे नियोजन करताना अडचणी येतात. मनपाचे नुकसान न होता तसेच मा.  नगरसदस्य यांना त्यांच्या कार्यक्रमाचे सुनियोजन करता यावे याकरीता मनपा प्रशासनाकडे सदरची मैदाने, सभागृहे भाडे तत्वावर मागणी करणा-या नागरिकांना अथवा संस्थेस स्थानिक नगरसदस्य  यांचे पत्र आणणे बंधनकारक करणेस व सदर पत्राशिवाय मैदाने, सभागृहे भाडे तत्वावर  न देणेस  मान्यता देणेत येत आहे.  तसेच  सदरचा विषय मा. विधी समिती सभेपुढे मान्यतेकामी पाठविणेस मान्यता देणेत येत  आहे.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक : २२ विषय क्रमांक : ८

दिनांक : १५/६/२०१६ विभाग :

सूचक : मा. सविता साळुंके अनुमोदक : मा. आर.एस.कुमार

संदर्भ :- मा. सविता साळुंके, नगरसदस्या यांचा दिनांक १५/६/२०१६ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक 27 मोरवाडीमध्ये निगडी दापोडी हा बीआरटीएस रस्ता जात आहे. या रस्त्यावर नजीकच्या भविष्यात बीआरटीएस बससेवा चालू करणेत येणार आहे. या रस्त्यावरील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौकामध्ये बँक ऑफ महाराष्ट्रचे समोर बीआरटीएस बसथांबा आहे. याठिकाणचे बसथांब्याला **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर चौक / Punyashloak Ahilyadevi Holkar Chouk** असे नाव देणेबाबत विचार करणे व या करीता पुणे महानगर परिवहन महामंडळ [ PMPML ] कडून वेगळी मान्यता घेणेची वाट न पाहणेबाबत विचार करणे .

**तसेच** याच चौकामधील ग्रेड सेपरेटरला **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर समतल विगलक / Punyashloak Ahilyadevi Holkar Grade Separator** असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

सदर विषयाचा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**-----**

वरील प्रमाणे अ प्रभाग समितीच्या मासिक सभेचे कामकाज होऊन मा.सभापती यांनी सभा संपलेचे जाहीर केले.

सही/-
( निलेश शंकरराव पांढरकर )
सभापती
अ प्रभाग समिती

क्र. अक्षेका /११/कावि/२७९/२०१६
दिनांक : ५/७/२०१६

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
अ प्रभाग समिती